पुस्तकी समायोजनाद्वारे समायोजित
अर्थसंकल्पीय तरतूद सन २०१७-१८
मागणी क्रमांक वाय-१, २०४९, व्याज प्रदाने
(०१) (०१) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
कर्मचा-यांच्या भविष्य निर्वाह निधीवरील व्याज
(२०४९ १२६८) भारित ४५, व्याज

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन निर्णय क्रमांकः बजेट-१४१७/प्र.क्र.२७४/पापु-२३

गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल, ७ वा मजला
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
तारीख: २२ मार्च, २०१८

वाचा :-

१. शासन परिपत्रक, वित्त विभाग क्रमांकः अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.१८ एप्रिल, २०१७
२. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे पत्र क्रमांकः मजीप्रा/वित्त-१/ताळमेळ/भनिनिलेखाशिर्ष ८३३६-८००-००७-०४/२७४, दि. २९ नोव्हेंबर, २०१७
३. प्रधान महालेखाकार कार्यालयाचे पत्र क्रमांकः Dep. / M.H. ८३३६ / MJP / ४९३, दि. ३ ऑक्टोबर, २०१७
४. शासन अधिसूचना, वित्त विभाग क्रमांकः भनिनि.२०१७/प्र.क्र.२०/सेवा-६, दि. २४ एप्रिल, २०१७
५. शासन अधिसूचना, वित्त विभाग क्रमांकः भनिनि.२०१७/प्र.क्र.२८/सेवा-६, दि. २४ जुलै, २०१७
६. शासन निर्णय, पा.पु.व स्व.वि., क्रमांकः बजेट-१४१७/प्र.क्र.२७४/पापु-२३, दि. ४ डिसेंबर, २०१७
७. शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांकः अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि. ३० जून,२०१७
८. शासन अधिसूचना, वित्त विभाग क्रमांकः भनिनि.२०१७/प्र.क्र.३४/सेवा-६, दि. ३१ ऑक्टोबर, २०१७
९. शासन अधिसूचना, वित्त विभाग क्रमांकः भनिनि-२०१८/प्र.क्र.१/सेवा-६, दि. ११ जानेवारी, २०१८
१०. शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांकः अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि. ६ फेब्रुवारी, २०१८

प्रस्तावना :-

सन १९८२-८३ पासून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे कार्यरत असलेल्या सर्व कर्मचारी / अधिकारी यांच्या भविष्य निर्वाह निधी पोटी प्राधिकरणाकडून प्राप्त होणारी वर्गणीची रक्कम / सांविधीक ठेव म्हणून लेखाशिर्ष-८३३६ नागरी ठेवी अंतर्गत शासनाकडे जमा करण्यात येते. शासनाकडे मार्च अखेर जमा असलेल्या एकूण रकमेवर भविष्य निर्वाह निधीच्या व्याज दराने प्रचलित पद्धतीने लेखाशिर्ष

२०४९ १२६८ अंतर्गत व्याज देण्यात येते. सदर व्याजाची रक्कम पुस्तकी समायोजनाने पुन्हा भविष्य निर्वाह निधीमध्ये जमा केली जाते. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई यांना द्यावयाच्या व्याजाचा खर्च भागविण्यासाठी आर्थिक वर्ष सन २०१७-१८ करिता रु.१८,३८,००,०००/- (अक्षरी रुपये अठरा कोटी अडोतीस लाख फक्त) इतकी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली आहे. वित्त विभागाने दिनांक ६.२.२०१८ च्या शासन परिपत्रकान्वये प्रस्तूत प्रकरणी १०० % निधी उपलब्ध असल्याचे नमूद केले आहे.

२. सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील कर्मचा-यांच्या भविष्य निर्वाह निधीवरील व्याजापोटी प्राधिकरणास रु.९,९२,२८,१०३/- (अक्षरी रुपये नऊ कोटी ब्याण्णव लाख अठ्ठावीस हजार एकशे तीन फक्त) इतकी व्याजाची रक्कम वाचा मधील ६ च्या शासन निर्णयान्वये मुक्त करण्यात आली आहे. आता अर्थसंकल्पीय एकूण रकमेपैकी उर्वरित रक्कम रु.८,४५,७१,८९७/- (अक्षरी रुपये आठ कोटी पंचेचाळीस लाख एकाहत्तर हजार आठशे सत्याण्णव फक्त) पुस्तकी समायोजनाद्वारे समायोजित करण्यासाठी प्राधिकरणास वितरीत करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

शासन निर्णय :-

आर्थिक वर्ष सन २०१७-१८ करीता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील कर्मचा-यांच्या भविष्य निर्वाह निधीवरील व्याजाचा खर्च भागविण्यासाठी मागणी क्रमांक वाय-१, २०४९, व्याज प्रदाने (०१) (०१) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कर्मचारी यांच्या भविष्यनिर्वाह निधीवरील व्याज (२०४९ १२६८) भारित ४५, व्याज या लेखाशिर्षाखाली रु.८,४५,७१,८९७/- (अक्षरी रुपये आठ कोटी पंचेचाळीस लाख एकाहत्तर हजार आठशे सत्याण्णव फक्त) इतकी व्याजाची रक्कम या शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात येत आहे.

२. या शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आलेल्या तरतूदीतून होणारा खर्च हा पुस्तकी समायोजनाद्वारे समायोजित करावयाचा असून हा खर्च महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील कर्मचा-यांच्या भविष्य निर्वाह निधीवरील व्याज प्रदान करण्यासाठी मागणी क्रमांक वाय-१, २०४९, व्याज प्रदाने (०१) (०१) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कर्मचा-यांच्या भविष्यनिर्वाह निधीवरील व्याज (२०४९ १२६८) भारित ४५, व्याज या लेखाशिर्षाखाली खर्ची दाखवून तो सन २०१७-१८ या वित्तीय वर्षातील मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

३. या शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आलेला निधी हा "८३३६-नागरी ठेवी, ८००-इतर ठेवी, (००) (०८) महाराष्ट्र पाणी पुरवठा व मलनि:सारण मंडळाच्या कर्मचा-यांचा भविष्य निर्वाह निधी (८३३६ ५०६७) " या शिर्षाखाली पुस्तकी समायोजनाने जमा करण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/ अर्थ-३, दिनांक १८ एप्रिल,२०१७ अन्वये विभागांना दिलेल्या अधिकारात निर्गमित करण्यात येत आहे. सदर निधी भविष्य निर्वाह निधीवरील व्याजाची रक्कम असून या निधीचे पुस्तकी समायोजन करण्यात येणार असल्याने या शासन परिपत्रकातील परिच्छेद ७ ते १८ मधील अटी तसेच परिशिष्टामधील इतर अटी व शर्तींची पूर्तता होत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३२२१६०८३७१७२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Balasaheb B Hajare

Digitally signed by Balasaheb B Hajare
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Supply and Sanitation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=49ad4eefa4101394c1b1119b5f2d93940a592bd8a91d2970b24702e05968e19f, cn=Balasaheb B Hajare
Date: 2018.03.22 17:04:01 +05'30'

बाळासाहेब बा. हजारे
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. विधानसभा / विधान परिषद सदस्य, सर्व
२. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
३. संचालक (वित्त), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
४. वित्तीय सल्लागार व मुख्य लेखाधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन, नवी मुंबई
५. महालेखापाल, महाराष्ट्र-१ मुंबई (लेखा व अनुज्ञेयता)
६. महालेखापाल, महाराष्ट्र-१ मुंबई (लेखा परिक्षा)
७. महालेखापाल, महाराष्ट्र-२ नागपूर (लेखा व अनुज्ञेयता)
८. महालेखापाल, महाराष्ट्र-२ नागपूर (लेखा परिक्षा)
९. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
१०. अधिदान व लेखा अधिकारी, अधिदान व लेखाधिकारी कार्यालय, वांद्रे, मुंबई
११. कक्ष अधिकारी, वित्त विभाग, (व्यय-३, अर्थ-१९, कोषा-५)
१२. कक्ष अधिकारी, नियोजन विभाग (कार्यासन-१४११)
१३. कार्यासन पापु-०४ व पापु-२०, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
१४. निवड नस्ती कार्यासन पापु-२३